# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

मध्यवर्ती कार्यालय,२ रा मजला, बेलापूर,नवी मुंबई-४०० ६१४.
दूरध्वनी : २७५७ १६७३, २७५७ ०१६६, २७५७ १६७७.


जा.क्र.मजीप्रा-२०२५/प्र.क्र.८९/आ.५

दिनांक : २०/०३/२०२६.

प्रति,
सहाय्यक संचालक (जाहिरात),
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
मंत्रालय, मुंबई.

विषय :- महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या आस्थापनेवरुन सेवानिवृत्त झालेल्या कनिष्ठ लिपीक/ वरिष्ठ लिपीक यांची सेवा करार पध्दतीने विवक्षित कामासाठी घेण्याबाबत.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या आस्थापनेवरुन सेवानिवृत्त झालेल्या कनिष्ठ लिपीक/ वरिष्ठ लिपीक यांची सेवा करार पध्दतीने विवक्षित कामासाठी घेण्यासाठी जाहिरात सुचना क्र. १ सन २०२५-२६ सोबत पाठविण्यात येत आहे. सदरची जाहिरात सर्वात जास्त खपाच्या राज्यस्तरीय प्रसिध्द होणाऱ्या एका मराठी वर्तमानपत्रात ९.५ x ६.०० चौ.से.मी. आकारातच एकदाच प्रसिध्दी देणेविषयी विनंती आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | कार्यालयाचे नांव | : | मुख्य प्रशासकीय अधिकारी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको भवन, २ रा मजला, दक्षिण कक्ष, नवी मुंबई. |
| २. | वृत्तपत्रात सविस्तर सूचना प्रसिध्द होण्याचा दिनांक | : | २४.०३.२०२६ |
| ३. | प्रसिध्दी कोणत्या स्तरावर आवश्यक आहे. | : | राज्यस्तरीय |
| ४. | जाहिरातीचे देयक कोणाकडे पाठवावयाचे आहे | : | मुख्य प्रशासकीय अधिकारी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको भवन, २ रा मजला, दक्षिण कक्ष, बेलापूर नवी मुंबई. |

जाहिरातीचे देयक (जाहिरातीसह)जाहिरात प्रसिध्द झाल्यानंतर आठ दिवसांत वर नमूद केलेल्या कार्यालयात पोहोचेल अशा प्रकारे आपल्या स्तरावरुन कळवावे.

(गजानन गुरव)
मुख्य प्रशासकीय अधिकारी

प्रत :- उप अभियंता (आयटी सेल), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको भवन, नवी मुंबई यांना माहिती व कार्यवाहीसाठी.

सोबत जोडलेली जाहिरात सूचना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करुन या कार्यालयास उलट टपाली अवगत करावे.

सोबत :- जाहिरात सूचना व अर्जाचा विहीत नमूना
प्रत :- कार्यालयीन सूचना फलक.

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

## संक्षिप्त जाहिरात सूचना क्र.१ २०२५-२६

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मध्यवर्ती कार्यालय, सिडको भवन, नवी मुंबई येथील कार्यालयातून म.जी.प्रा.च्या सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या वरिष्ठ लिपीक व कनिष्ठ लिपीक या संवर्गातील विवक्षित कामासाठी एक वर्षाकरीता करार पध्दतीने नियुक्ती करावयाची आहे. याबाबतचा सविस्तर तपशील https://mjp.maharshtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

सही/-

मुख्य प्रशासकीय अधिकारी

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

**सिडको भवन, दुसरा मजला, (द.क.) बेलापूर,नवी मुंबई -४०० ६१४.**

दूरध्वनी:- २७५७ १६७३, २७५७ ०१६६, २७५७ १६७७.

## सविस्तर सूचना क्र.१ सन २०२५-२६

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मध्यवर्ती कार्यालय, नवी मुंबई या कार्यालयात महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या आस्थापनेवरुन सेवानिवृत्त झालेल्या वरिष्ठ लिपीक / कनिष्ठ लिपीक यांची सेवा करार पध्दतीने खालील विवक्षित कामे करण्यासाठी घेण्याचे प्रस्तावित आहे.

| अ.क्र. | विवक्षित कामाचा तपशिल | सेवानिवृत्त अधिकारी आवश्यक संवर्ग | आवश्यक पदे | विवक्षित नियुक्तीचा कालावधी |
|---|---|---|---|---|
| १. | १. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील अभियंते, अधिकारी/ कर्मचारी यांच्या महत्वाच्या कर्तव्य व जबाबदाऱ्या या सर्वसाधारण स्वरुपाच्या आहेत. सदर कर्तव्य व जबाबदाऱ्यांचे अवलोकन करुन पदनिहाय कर्तव्य व जबाबदाऱ्या पुनर्निश्चित करणे, या कर्तव्य जबाबदाऱ्या ठरविताना प्रशासकीय, वित्तीय व तांत्रिक असे अधिकार निश्चित करणे.<br>२. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मा.संचालक मंडळाच्या बैठकीतील सर्व कार्यक्रम बाबींची एकत्रित सूची करुन त्या आद्ययावत करणे.<br>३. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या आकृतीबंध व प्रत्यक्षात आवश्यक मनुष्यबळ याचा ताळमेळ घेऊन अतिरिक्त मनुष्यबळासाठी प्रस्ताव शासनास पाठविणे.<br>४. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील आस्थापना विषयक व परिपत्रके व नियम याचा सारसंग्रह तयार करणे.<br>५. वित्त व लेखा संवर्गातील सेवाभरती नियम १९९७ चे आहेत यामध्ये सुधारणा करणे.<br>६. परिक्षा नियमामध्ये सुधारणा करणे.<br>१०. वरिष्ठांच्या सुचनेनुसार इतर कामे करणे. | वरिष्ठ लिपीक (एस-८, २५५००-८११००)<br><br>कनिष्ठ लिपीक (एस-६, १९९००-६३२००) | २<br><br>२ | १२ महिने<br><br>१२ महिने |

उपरोक्त कामे करण्याकरीता, सामान्य प्रशासन विभागाच्या दि. १० जून, २०२५ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार नियुक्ती करावयाची असून सदर शासन निर्णयातील तरतुदीनुसार नियुक्त सेवानिवृत्त वरिष्ठ लिपीक, कनिष्ठ लिपीक यांना मासिक पारिश्रमिक व भत्ते देय राहतील. याकरिता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या आस्थापनेवरुन सेवानिवृत्त झालेल्या व उपरोक्त कामाचा अनुभव असलेल्या इच्छुक वरिष्ठ लिपीक, कनिष्ठ लिपीक यांचेकडून विहित नमुन्यात विवक्षित कामाकरीता करार पध्दतीने नियुक्ती करण्याकरिता अर्ज मागविण्यात येत आहे.

२. सदर अर्ज दि. ७ एप्रिल २०२६ पर्यंत सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत मा.मुख्य प्रशासकीय अधिकारी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको भवन, दूसरा मजला बेलापूर नवी मुंबई-४००६१४ या पत्त्यावर पाठवावेत. यानंतर आलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत.

३. अटी व शर्ती :-

१. सदर नियुक्ती ही सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १० जून, २०२५ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार करण्यात येईल.

२. अर्जदार सेवानिवृत्त वरिष्ठ लिपीक, कनिष्ठ लिपीक या संवर्गातील असावेत.

३. वर नमूद केलेल्या कामाचा किमान ३ ते ५ वर्षाचा अनुभव असावा.

४. उमेदवाराचे वय ६५ वर्षापेक्षा अधिक नसावे.

५. कामाचे ठिकाण मुबई/नवी मुंबई येथील असल्यामुळे उमेदवार मुंबई /ठाणे / रायगड जिल्हयातील राहणारा असावा.

६. आवश्यक असलेली अर्हता धारण करणाऱ्या इच्छूक सेवानिवृत्त वरिष्ठ लिपीक, कनिष्ठ लिपीक यांनी सदर पदाकरीता विहित नमुन्यात अर्ज सादर करावा.

७. इच्छूक उमेदवारांनी अर्ज व नमुद केलेल्या कालावधीच सादर करावेत.

८. मुलाखतीद्वारे पात्र उमेदवाराची निवड करण्यात येईल. उमेदवार निवडीबाबत संपुर्ण अधिकार प्राधिकरणास राहतील.

९. करार पध्दतीने नियुक्त केलेल्या सेवानिवृत्त वरिष्ठ लिपीक, कनिष्ठ लिपीक यांना महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, एक्सप्रेस टॉवर्स, मुंबई व मुख्य प्रशासकीय अधिकारी, म.जी.प्रा. बेलापूर, नवी मुंबई यांचे नियंत्रणाखाली काम करावे लागेल. व त्यांचेकडे कामाकाजाचा अहवाल दरमहा सादर करावा लागेल.

१०. इतर अटी व शर्ती हया सामान्य प्रशासन विभागाच्या दि. १० जून, २०२५ रोजीच्या शासन निर्णयातील नमुद केल्याप्रमाणे लागू राहतील.

(गजानन गुरव)
मुख्य प्रशासकीय अधिकारी

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

सेवानिवृत्त कनिष्ठ लिपीक/वरिष्ठ लिपीक यांना विवक्षित कामाकरीता करार पध्दतीने नियुक्ती करण्याकरिता अर्ज

| अर्जदाराचा<br>अलीकडील काळाचे<br>छायाचित्र |
|---|

१. अर्जदाराचे संपूर्ण नाव :-

२. अर्जदाराचा पत्ता :-

३. भ्रमणध्वनी क्रमांक :-

४. जन्मदिनांक व वय :-

५. सेवानिवृत्त झाल्याचा दिनांक व कार्यालय (सोबत आदेशाची प्रत जोडावी.) :-

६. सेवानिवृत्तीच्या वेळेचे पदनाम :-

७. प्राधिकरणास आवश्यक असलेली अर्हता आहे किंवा कसे :-

८. मुळ निवृत्ती वेतन (निवृत्तीवेतन मिळत असलेल्या आदेशाची प्रत जोडावी) :-

९. शैक्षणिक अर्हता :-

१०. अनुभव :-

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने सविस्तर जाहिरातीमध्ये नमुद केलेली कामे व संबंधित नियंत्रण अधिकारी यांची सुचविलेली कामे इत्यादी कामे करण्याकरिता तसेच सदरील कामे करण्याकरीता कमीत कमी ३ वर्षाचा अनुभव असलेल्या सेवानिवृत्त कनिष्ठ लिपीक/वरिष्ठ लिपीक यांची करार पदधतीने १ वर्षासाठी करावयाच्या नियुकतीची जाहिरात/सुचना मी काळजीपुर्वक वाचली असून सदर जाहिरातीतील/सुचनेतील सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.

ठिकाण :-

दिनांक :- (अर्जदाराची स्वाक्षरी व नांव)